**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

१८/४/१७

( हनुमंत गोफणे )
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९६

---

प्रसिध्दी पत्रक क्र.०३
दिनांक : १९.०४.२०१७

## वातानुकूलित बसपासधारकांना शिल्लक रकमेचा परतावा

मुंबई, १९ - बेस्ट उपक्रमाने सोमवार दि.१७ एप्रिल २०१७ पासून वातानुकूलित बससेवांचे प्रवर्तन स्थगित केलेले आहे. या अनुषंगाने ज्या प्रवाशांनी वातानुकूलित बससेवांचे बसपास घेतलेले आहेत, अशा प्रवाशांना त्यांच्या बसपासवरील शिल्लक रक्कमेचा परतावा करण्यात येणार आहे.

या परताव्याकरीता वातानुकूलित बसपासधारक प्रवासी उपक्रमाच्या कोणत्याही बसआगारातील बसपास वितरण केंद्रात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत शिल्लक रकमेच्या परताव्याकरीता स्मार्टकार्ड व विनंती अर्जासह संपर्क साधतील. बसपास वितरण केंद्रातील बसवाहक बसपासचा (स्मार्टकार्ड) 'कालावधी समाप्त' (De-activate) करतील. तद्नंतर संबंधित आगारातील तिकीट व रोख विभागात बसपासधारक प्रवाशांना शिल्लक रकमेचा परतावा करण्यात येईल. ज्या प्रवाशांना शिल्लक रकमेचा परतावा घ्यावयाचा नसेल असे प्रवासी बसपासच्या वैध मुदतीपर्यंत साध्या, मर्यादित व जलद बससेवांमधून प्रवास करु शकतील.

सर्व वातानुकूलित बसपासधारक प्रवाशांनी या सुचनेची नोंद घेऊन बसपासवरील शिल्लक रकमेच्या परताव्याकरीता उपक्रमाच्या बसआगारातील बसपास वितरण केंद्रात संपर्क साधावा, ही विनंती.

........